# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ६

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**बाब क्रमांक: १७८, रूपये:- १४,३१,०५,२९,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ११०७ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये हर घर जल अशी घोषणा करून ग्रामीण भागात घरोघरी स्वतंत्र नळ पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट केंद्र व राज्य शासनाने ठेवले परंतु सांगोला तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत अनेक योजनांचे काम निधी अभावी ठप्प झाले आहे. तरी सांगोला तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत अनेक योजनांचे काम सुरू करण्यासाठी निधीची तरतूद राज्य शासनाकडून तात्काळ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२) | ११०२ | १०० | आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाडे आजही शाश्वत पाणीपुरवठ्यापासून वंचित असणे, प्रत्येक पाड्याच्या भौगोलिक स्थितीनुसार तिथे लघु उदंचन केंद्रे (Mini Pumping Stations) किंवा एकत्रित मोठे केंद्र उभारणे गरजेचे असणे, २७ पाड्यांसाठी 'एकात्मिक पाणीपुरवठा योजना' (Integrated Water Supply Scheme) राबवावी. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पंपिंग सिस्टमचा विचार करावा जेणेकरून वीज बिलाचा भार पडणार नाही. आरे आदिवासी वसाहतीतील २७ पाड्यांवर नवीन उदंचन केंद्र निर्माण व पाणीपुरवठा उपाययोजना करण्याची आवश्यकता, याकरिता आदिवासी उपयोजनेंतर्गत (Tribal Sub-Plan) या कामासाठी विशेष निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (३) | ११०९ | १०० | मौजे पेठ ता.वाळवा येथे राष्ट्रीय पेयजल योजनेतून पेठ, वाघवाडी व जांभुळवाडी गावासाठी नविन पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली असणे, सन २०२२ मध्ये कागदोपत्री पुर्ण झालेली होती परंतू योजनेतील बरीच कामे अपूर्ण असणे, त्यामध्ये अनेक त्रुटी असणे, सदर योजना ग्रामपंचायतीने अदयाप हस्तांतर न करणे, पेठ हे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गाव शहरानजीक असल्यामुळे लोकसंख्या सर्वात जास्त असणे, परंतु योजना प्रस्तावित करताना योजनेची गृहीत लोकसंख्या चुकीची परिगणित झाल्याने योजनेचा विस्तृत सर्व्हे न झाल्यामुळे पाणी कमी प्रमाणात मिळणे, सद्य:स्थितील ५० टक्के गावात पाणी पुरवठा होत असणे, पाईपचा दर्जा निकृष्ट असणे, ३५० पेक्षा जास्त लिकेजस झालेली असणे, गावात ८० पेक्षा जास्त व्हॉल्व टाकल्यामुळे योजना चालविणे कठीण होणे, योजनेमध्ये निकृष्ट दर्जाचे काम, गावास आठ आठ दिवस पाणी मिळत नसतानाही ठेकेदारास बिले अदा होणे, याबाबत अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमत असणे, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषी ठेकेदार व अधिकारी यांचेवर कारवाई करुन ग्रामपंचायतीने नवीन योजना मागणी केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ३१ कोटीची नवीन योजना प्रस्तावित केलेली असणे, सदर योजना सौर ऊर्जेवर आधारित करुन त्यास तात्काळ मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (४) | १०९१ | १० | यवतमाळ मतदार संघात अनेक गावांत ग्रामीण भागात उन्हाळयामुळे आता पाणी टंचाई भासण्यास सुरुवात होणार असणे, अनेक ठिकाणी पाईपलाईन पाण्याची टाकी बांधून तयार आहे परंतू राहिलेले अर्धवट कामे जलजीवन मिशनचे असून कंत्राटदारांचे कोटी रुपये बिले बाकी असून त्यामुळे ते उर्वरित काम करण्यास तयार नाही. पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी त्यांना तात्काळ भरीव निधी देवून देयके अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (५) | १०८६ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या पाणी हा केवळ विकासाचा विषय नाही, तर तो जीवन-मरणाचा प्रश्न आहे. जल जीवन मिशन अंतर्गत भिवापूर, कुही आणि उमरेड तालुक्यांमध्ये ३३७ योजना मंजूर झाल्या, त्यापैकी २०६ योजना पूर्ण झाल्या असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कामे अपूर्ण, देयके प्रलंबित आणि कंत्राटदार आर्थिक अडचणीत आहेत. पूर्ण झालेल्या कामांसाठी रुपये ६.१४ कोटी केंद्रीय निधी अद्याप प्रलंबित आहे. उर्वरित कामांसाठी रुपये ७३.६३ कोटी निधीची गरज आहे. निधीअभावी कामांचा वेग मंदावला आहे. गावोगावी नागरिकांना अजूनही टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. शासनाच्या घोषणांमध्ये आणि प्रत्यक्ष वास्तवात मोठी दरी आहे. जर शासन खरोखरच ग्रामीण विकासाबाबत गंभीर असेल, तर केंद्राकडून येणाऱ्या निधीची वाट पाहत बसू नये. राज्याने तात्काळ केंद्राच्या वाट्याएवढा निधी उपलब्ध करून कामांना गती द्यावी. अन्यथा ही केवळ कागदोपत्री प्रगती ठरेल. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | १०८८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर, कुही व उमरेड तालुक्यांतील जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनांबाबत लक्ष वेधू इच्छितो. मतदारसंघात एकूण ३३७ योजना मंजूर असून त्यापैकी २०६ योजना पूर्ण झाल्या आहेत व १२६ योजना प्रगतीपथावर आहेत. सद्यस्थितीत रुपये ६६.३१ कोटी खर्च झालेला आहे. तथापि, पूर्ण झालेल्या कामांसाठी रुपये ६.१४ कोटी केंद्रीय निधी प्रलंबित आहे. तसेच उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी रुपये ७३.६३ कोटी निधीची आवश्यकता आहे. केंद्राचा निधी वेळेत न मिळाल्यामुळे कामांच्या गतीवर परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधण्याचा माझा प्रयत्न आहे. राज्य शासनाने केंद्राच्या वाट्याचा निधी तात्पुरता उपलब्ध करून देऊन कामांना गती द्यावी व केंद्राकडून निधी मिळाल्यानंतर समायोजन करावे, अशी माझी मागणी आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई